


# गुड्डूची लाल सायकल


अरविंद पासी

सुबिनीता देशप्रभु

# गुड्डू ची लाल सायकल

लेखकः अरविंद पासी

चित्रांकनः सुबिनीता देशप्रभु

मराठी अनुवादः सुधा कुलकर्णी



गुड्डू च्या आई वडलांनी त्याच्यासाठी बाजारातून एक गंमत आणली होती.

त्याच्या वाढदिवसासाठी त्यांनी एक चकचकीत लाल सायकल आणली होती!



9555

गुड्डू सायकलीकडे पाहतच राहिला. तो परत परत सायकलची घंटा वाजवतच राहिला.
ट्रिंग-ट्रिंग-ट्रिंग-ट्रिंग-ट्रिंग-ट्रिंग




'आपण खूप वेगाने सायकल चालवतो आहोत' असे स्वप्न पाहत होता.

खूप वेळाने तो आपल्या नवीन चकचकीत सायकलवर बसला. तो पहिल्यांदाच सायकलवर बसत होता. मनातून थोडी भीती वाटत होती. पण मागच्या मोठ्या चाकाला दोन लहान चाके असल्यामुळे तो पडला नाही.



घराच्या बाजूच्या गल्लीत गुड्डू ने सायकल खूप फिरवली. ट्रिंग-ट्रिंग-ट्रिंग-ट्रिंग-ट्रिंग-ट्रिंग!
"मला एकदा तरी दे ना रे गुड्डू सायकल चालवायला," मन्नाने विनवले.



पण गुड्डू सायकल चालवतच राहिला -
ट्रिंग-ट्रिंग-ट्रिंग-ट्रिंग-ट्रिंग-ट्रिंग!!

सायकल चालवतच राहिल्यामुळे थोड्या वेळाने त्याचा धीर आणखी वाढला.



तेवढ्यात धडाम् करून तो पडला - ओयऽऽ!! आई धावत धावत आली. ''अरे गुड्डू तू फार मस्तीखोर आहेस. धडपड न करता तू राहूच शकत नाहीस का?''

''काही असो, माझ्या डोक्यातला ट्रिंग-ट्रिंग आवाज तर बंद झाला,'' वडील म्हणाले. ''माझी बिचारी लाल चकचकीत सायकल!'' गुड्डू रडत रडत म्हणाला.



आईने गुड्डूच्या जखमा धुतल्या आणि साफ केल्या. त्याला प्रेमाने जवळ घेतले आणि म्हणाली, ''जा खेळायला, पण जरा सांभाळून, धडपडू नकोस.''

गुड्डू बाहेर आला... अरे, पण त्याची लाडकी आवडती सायकल गायब झाली होती! तेव्हा त्याची नजर सायकल चालवणाऱ्या मन्नावर पडली... आणि त्याला ऐकू आले ट्रिंग-ट्रिंग-ट्रिंग!!



# Read India

प्रथम बुक्सची स्थापना २००४ मध्ये झाली. मुलांच्या वाचनाला चालना देण्यासाठी, 'रीड इंडिया' नावाचा उपक्रम राष्ट्रीय पातळीवर सुरु झाला होता त्याच चळवळीचा एक भाग म्हणून ही स्थापना झाली. प्रथम बुक्स ही अनेक भारतीय भाषांमध्ये, दर्जेदार पुस्तकं प्रकाशित करणारी ना-नफा संस्था आहे. 'प्रत्येक मुलाच्या हाती पुस्तक' हे आमचं ध्येय असून, त्याद्वारे भारतातल्या सर्व मुलांपर्यं वाचनाचा आनंद पोहोचवायचा आहे. यात कोणत्याही प्रकारे सहभागी होण्यासाठी info@prathambooks.org या पत्यावर इमेल पाठवा.

---

अरविंद पारी मॅग्नम बुक्स प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक आहेत. गेली सतरा वर्षे ते पुस्तक प्रकाशनाशी संलग्न आहेत. लहान मुलांसाठी त्यांनी पुस्तकं लिहिलेली असून अनेक गोष्टींचं पुनर्लेखन केलं आहे.

सुबिनीता देशप्रभु या डिझायनर असून त्यांनी शाळेमध्ये कला हा विषय शिकवला आहे. आता त्या मुलांच्या पुस्तकांसाठी चित्रं काढतात.

गुड्डूला आपल्या चकचकीत लाल सायकलवर बसून खूप फिरायचे होते.
तो सायकल चालवायला गेला तेव्हा काय झाले? वाचा आणि जाणून घ्या!

टप्प्याटप्प्याने वाचायला शिकणे. या पुस्तकाची वाचन पातळी १ आहे.

**१ प्रारंभिक वाचन / मुलांना वाचून दाखवण्यासाठी**
वाचायला नुकतीच सुरुवात करणाऱ्या आणि गोष्ट ऐकायला आवडणाऱ्या छोट्टुकल्यांसाठी.

**२ वाचायला शिकणे**
ओळखीचे शब्द वाचू शकणाऱ्या आणि मदत घेऊन नवे शब्द वाचणाऱ्या मुलांसाठी.

**३ स्वतंत्रपणे वाचन**
आपले आपण वाचणाऱ्या मुलांसाठी.

**४ सराईतपणे वाचन**
आत्मविश्वासानं वाचणाऱ्या मोठ्या मुलांसाठी.

**PRATHAM BOOKS**

प्रथम बुक्स ही ना-नफा संस्था असून मुलांमध्ये वाचनाची आवड रुजावी यासाठी अनेक भारतीय भाषांमध्ये पुस्तकं प्रकाशित करते.

www.prathambooks.org

Guddu Learns to Ride
(Marathi)
MRP: Rs. 15.00
ISBN 978-93-5022-109-9
9 789350 221099